# कुंभपर्वाचे माहात्म्य
## (कुंभपर्वक्षेत्रे आणि कुंभमेळे यांच्या वैशिष्ट्यांसह)

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे [मुद्दे] '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


| | |
|---|---|
| – आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! | ६ |
| – मनोगत | ७ |
| – प्रस्तावनात्मक विवेचन | ८ |
| १. कुंभमेळ्याशी संबंधित विविध संज्ञांचा अर्थ | ९ |
| २. ग्रहगणितानुसार चार कुंभक्षेत्री भरणारा कुंभपर्व | १० |
| ३. कुंभपर्वक्षेत्रे आणि त्यांचे माहात्म्य | १३ |
| * प्रयाग (अलाहाबाद) * हरद्वार (हरिद्वार) | १३ |
| * उज्जैन * त्र्यंबकेश्वर आणि नाशिक | २१ |
| ४. कुंभमेळ्याचे धार्मिक महत्त्व | २९ |
| ५. कुंभमेळ्याची वैशिष्ट्ये | ३१ |
| * सहस्रो वर्षांची परंपरा असलेले सांस्कृतिक एकतेचे व्यासपीठ ! | ३१ |
| * हिंदु धर्मातील विविध पंथ अन् संप्रदाय यांच्या एकतेचा मेळा ! | ३२ |
| * जातीव्यवस्था ही वैदिक नाही, हे सिद्ध करणारा कुंभमेळा ! | ३३ |
| ६. कुंभमेळ्यात सहभागी होणारे विविध आखाडे ! | ३९ |
| ७. कुंभमेळ्याचा आध्यात्मिक लाभ करून घ्या ! | ४३ |

# मनोगत

कुंभमेळा म्हणजे जगातील सर्वांत मोठी धार्मिक यात्रा ! कुंभमेळा हे भारताच्या सांस्कृतिक महत्तेचे केवळ दर्शन नव्हे, तर संतसंग देणारे आध्यात्मिक संमेलन आहे. कुंभपर्वाच्या निमित्ताने प्रयाग, हरद्वार (हरिद्वार), उज्जैन आणि त्र्यंबकेश्वर–नाशिक या चार क्षेत्री प्रत्येक १२ वर्षांनी भरणाऱ्या यात्रेला हिंदु जीवनदर्शनात महत्त्वपूर्ण स्थान आहे. कुंभपर्वाचे आध्यात्मिक माहात्म्य आणि सांस्कृतिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. गुरूला राशीचक्र भोगण्यास १२ वर्षे लागत असल्यामुळे प्रत्येक १२ वर्षांनी कुंभयोग येतो. गुरु कुंभ राशीत असतांना 'कुंभपर्व', सिंह राशीत असतांना 'सिंहस्थपर्व' आणि कन्या राशीत असतांना 'कन्यागतपर्व' अशा तीन मोठ्या पर्वणी हिंदु धर्मदृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जातात. तेथे गंगास्नान, साधना, दानधर्म, पितृतर्पण, श्राद्धविधी, संतदर्शन, धर्मचर्चा इत्यादी धार्मिक कृती करण्यासाठी कोट्यवधी भाविक येतात. हा श्रद्धावानांचा मेळाच आहे. केवळ भाविकच नव्हे, तर देवता, ऋषी, संत अन् तेहतीस कोटी तीर्थे कुंभपर्वास येतात, हे सारे अद्वितीय आहे. 'हिंदूऐक्य' हा कुंभमेळ्याचा उद्घोष आहे. कुंभमेळ्यातून हिंदूंची धार्मिक अन् सांस्कृतिक अमरता प्रतीत होते. हा मेळा परदेशी नागरिकांना हिंदु धर्माच्या अंतरंगाचे दर्शन घडवतो. कुंभमेळ्यात श्रद्धेने आचरण करणाऱ्या भाविकांनाच कुंभपर्वाचा खऱ्या अर्थाने आध्यात्मिक लाभ होतो. या ग्रंथात प्रामुख्याने कुंभमेळ्याचे माहात्म्य आणि कुंभपर्वक्षेत्रे यांचे माहात्म्य विषद केले आहे. हा ग्रंथ वाचून भाविकांना कुंभपर्वाचा आध्यात्मिक लाभ करून घेता यावा, हीच कुंभपर्वस्थित देवतांच्या चरणी प्रार्थना ! – संकलक